# परमहंस परिव्राजकाचार्य स्वामींची नित्यपारायणाची स्तोत्रे

॥श्री॥

श्रीगणेशाय नम: । श्रीसरस्वत्यै नम: । श्रीगुरुभ्यो नम: । महामाया महाविद्या महायोगा महोत्कटा । माहेश्वरी कुमारी च ब्रह्माणी ब्रह्मरूपिणी। वागीश्वरी योगरूपा योगिनी कोटिसेविता। जया च विजया चैव कौमारी सर्वमङ्गला। हिंगुला च विलासी च ज्वालिनी ज्वालरूपिणि । ईश्वरी क्रूरसंहारी कुलमार्ग प्रदायिनी । वैष्णवी सुभगाकार्या सुकुल्या कुलपूजिता। वामाङ्गा वामचारा च वामदेव प्रिया तथा। डाकिनी योगिनीरूपा भूतेशी भूतनायिका। पद्मावती पद्मनेत्रा प्रबुधा च सरस्वती। भूचरी खेचरी माया मातङ्गी भुवनेश्वरी। कान्ता पतिव्रता साक्षी सुचक्षु: कुण्डवासिनी। अुमा कुमारी लोकेशी सुकेशी पद्मरागिणी। इन्द्राणी ब्रह्मचाण्डाली चण्डिका वायुवल्लभा। सर्वधातुमयी मूर्ति: जलरूपा जलोदरी। आकाशी रणगा चैव नृकपाल विभूषणा। नर्मदा मोक्षदा चैव धर्मकामार्थदायिनी। गायत्री चाथ सावित्री त्रिसन्ध्या तीर्थगामिनी। अष्टमी नवमी चैव दशम्येकादशी तथा। पौर्णमासी कुहूरूपा तिथिमूर्ति स्वरूपिणी। सुरारि नाशकारी च उग्ररूपा च वत्सला। अनला चार्ध मात्रा च अरुणायत- लोचना। लज्जा सरस्वती विद्या भवानी पापनाशिनी। नागपाशधरा मुर्तिरगाधा धृतकुण्डला। क्षयरूपा क्षयकरी तेजस्विनी शुचिस्मिता। अव्यक्ता व्यक्तलोका च शम्भुरूपा मनस्विनी। मातङ्गी मत्तमातङ्गी महादेवप्रिया तथा। दैत्यघ्नी चैव वाराही सर्वशास्त्रमयी शुभा।

# श्रीमद् आद्यशंकराचार्यकृता ब्रह्मज्ञानावलीमाला

सकृच्छ्रवणमात्रेण ब्रह्मज्ञानं यतो भवेत् ।
ब्रह्मज्ञानावलीमाला सर्वेषां मोक्षसिद्धये ।।१ ।।

असंगोऽहमसंगोऽहमसंगोऽहं पुन: पुन: ।
सच्चिदानंदरूपोऽहमहमेवाहमव्यय: ।।२ ।।

नित्यशुद्धविमुक्तोहं निराकारोऽहमव्यय: ।
भूमानंदस्वरूपोऽहमहमेवाहमव्यय: ।।३ ।।

नित्योऽहं निरवद्योऽहं निराकारोहमव्यय: ।
परमानंदरूपोऽहमहमेवाहमव्यय: ।।४ ।।

शुद्धचैतन्यरूपोऽहमात्मारामोहमेवच ।
अखंडानंदरूपोऽहमहमेवाहमव्यय: ।।५ ।।

प्रत्यक्चैतन्यरूपोऽहं शान्तोहं प्रकृते: पर: ।
शाश्वतानंदरूपोऽहमहमेवाहमव्यय: ।।६ ।।

तत्त्वातीत: परात्माहं मध्यातीत: पर: शिव: ।
मायातीत: परंज्योतिरहमेवाहमव्यय: ।।७ ।।

नानारूपव्यतीतोऽहं चिदाकारोहमच्युत: ।
सुखरूपस्वरूपोऽहमहमेवाहमव्यय: ।।८ ।।

मायातत्कार्यदेहादि मम नास्त्येव सर्वदा ।
स्वप्रकाशैकरूपोऽहमहमेवाहमव्यय: ।।९ ।।

गुणत्रयव्यतीतोऽहं ब्रह्मादीनां च साक्ष्यहम् ।
अनंतानंतरूपोऽहमहमेवाहमव्यय: ।।१० ।।

अन्तर्यामीस्वरूपोऽहं कूटस्थ: सर्वगोस्म्यहं ।
परमात्मस्वरूपोऽहमहमेवाहमव्यय: ।।११ ।।

निष्कलोऽहं निष्क्रियोऽहं सर्वात्माद्य: सनातन: ।
अपरोक्षस्वरूपोऽहमहमेवाहमव्यय: ।।१२ ।।

द्वंद्वादिसाक्षिरूपोऽहमचलोहं सनातन: ।
सर्वसाक्षिस्वरूपोऽहमहमेवाहमव्यय: ।।१३ ।।

प्रज्ञानघनएवाहं विज्ञानघन एवच ।
अकर्ताऽहमभोक्ताऽहमहमेवाहमव्यय: ।।१४ ।।

निराधारस्वरूपोऽहं सर्वाधारोहमेव च ।
आत्मकामस्वरूपोऽहमहमेवाहमव्यय: ।।१५ ।।

तापत्रयविनिर्मुक्तो देहत्रयविलक्षण: ।
अवस्थात्रयसाक्ष्यस्मि चाहमेवाहमव्यय: ।।१६ ।।

दृग्दृश्यौ द्वौ पदार्थौ स्त: परस्पर विलक्षणौ ।
दृग्ब्रह्म दृश्यं मायेति सर्ववेदांतडिंडिम: ।।१७ ।।

अहंसाक्षीति यो विद्याद्विविविच्यैवं पुन: पुन: ।
स एव मुक्त: सविद्वानिति वेदांतडिंडिम: ।।१८ ।।

घटकुड्यादिकं सर्वं मृत्तिकामात्रमेव च ।
तद्वद्ब्रह्म जगत्सर्वमिति वेदांतडिंडिम: ।।१९ ।।

ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या जीवोब्रह्मैव नापर: ।
अनेनवेद्यं सच्छास्त्रमितिवेदांतडिंडिम: ।।२० ।।

अन्तर्ज्योतिर्बहिर्ज्योति: प्रत्यग्ज्योति: परात्पर: ।
ज्योतिर्ज्योति: स्वयंज्योतिरात्मज्योति: शिवोस्म्यहं ।।२१ ।।

।। इति ब्रह्मज्ञानावलीमाला समाप्ता ।।

# श्रीमद् आद्यशंकराचार्यकृता स्वरूपानुसंधानस्तुतिः (विज्ञान नौका)

तपोयज्ञदानादिभिः शुद्धबुद्धिर्विरक्तोनृपादेः पदे तुच्छबुद्ध्या ।
परित्यज्य सर्वं यदाप्नोतितत्त्वं परंब्रह्मनित्यं तदेवाहमस्मि ॥१॥
दयालुं गुरुं ब्रह्मनिष्ठं प्रशांतं समाराध्यमत्या विचार्यस्वरूपम् ।
यदाप्नोतितत्त्वं निदिध्यास्य विद्वान्परंब्रह्मनित्यं तदेवाहमस्मि ॥२॥
यदानन्दरूपं प्रकाशस्वरूपं निरस्तप्रपंचं परिच्छेदहीनं ।
अहंब्रह्मवृत्त्यैकगम्यं तुरीयं परंब्रह्मनित्यं तदेवाहमस्मि ॥३॥
यदज्ञानतो भाति विश्वं समस्तं प्रनष्टं च सद्यो यदात्मप्रबोधे ।
मनोवागतीतं विशुद्धं विमुक्तं परं ब्रह्मनित्यं तदेवाहमस्मि ॥४॥
निषेधे कृते नेति नेतीतिवाक्यैः समाधिस्थितानां यदाभातिपूर्णं ।
अवस्थात्रयातीतमद्वैतमेकं परंब्रह्मनित्यं तदेवाह मस्मि ॥५॥
यदा नंदलेशैः समानन्दिविश्वं यदाभातिसत्त्वेतदाभातिसर्वं ।
यदालोकने रूपमन्यत्समस्तं परंब्रह्मनित्यं तदेवाहमस्मि ॥६॥
अनंतं विभुं निर्विकल्पं निरीहं शिवं संगहीनं यदोङ्कारगम्यम् ।
निराकारमत्युज्ज्वलं मृत्युहीनं परं ब्रह्मनित्यं तदेवाह मस्मि ॥७॥
यदानंदसिंधौ निमग्नः पुमान्स्यादविद्याविलासः समस्तप्रपंचः ।
तदानस्फुरत्यद्भुतं यन्निमित्तं परं ब्रह्मनित्यं तदेवाहमस्मि ॥८॥
स्वरूपानुसंधानरूपां स्तुतिं यः पठेदादराद्भक्तिभावो मनुष्यः ।
शृणोतीहवानित्यमुद्युक्तचित्तो भवेद्विष्णुरत्रैव वेदप्रमाणात् ॥९॥

॥ इति स्वरूपानुसंधानस्तुतिः ॥

# ।। तोटकाष्टकम् ।।

विदिताखिलशास्त्रसुधाजलधे
महितोपनिषत्कथितार्थनिधे ।
हृदये कलये विमलं चरणं
भव शङ्कर देशिक मे शरणम् ।।१ ।।
करुणावरुणालय पालय मां
भवसागरदु:खविदूनहृदम् ।
रचयाखिलदर्शनतत्त्वमिदं
भव शङ्कर देशिक मे शरणम् ।।२ ।।
भवता जनता सुहिता भविता
निजबोधविचारणचारुमते ।
कलयेश्वरजीवविवेकविदं
भव शङ्कर देशिक मे शरणम् ।।३ ।।

भव एव भवानिति मे नितरां
समजायत चेतसि कौतुकिता ।
मम वारय मोहमहाजलधिं
भव शङ्कर देशिक मे शरणम् ।।४ ।।
सुकृतेऽधिकृते बहुधा भवतो
भविता समदर्शनलालसता ।
अतिदीनमिमं परिपालय मां
भव शङ्कर देशिक मे शरणम् ।।५ ।।
जगतीमवितुं कलिता कृतयो
विचरन्ति महामहसच्छलत: ।
अहिमांशुरिवात्र विभासि गुरो
भव शङ्कर देशिक मे शरणम् ।।६ ।।

गुरुपुङ्गव पुङ्गव केतन ते
समतामयतां न हि कोऽपि सुधी: ।
शरणागतवत्सल तत्त्वनिधे
भव शङ्कर देशिक मे शरणम् ।।७ ।।
विदिता न मया विशदैककला
न च किञ्चन काञ्चनमस्ति गुरो ।
द्रुतमेव विधेहि कृपां सहजां
भव शङ्कर देशिक मे शरणम् ।।८ ।।

आद्य शंकराचार्य विरचित

# ।। कालभैरवाष्टकम् ।।

देवराजसेव्यमानपावनाङ्घ्रिपङ्कजं
व्यालयज्ञसूत्रमिन्दुशेखरं कृपाकरम् ।
नारदादियोगिवृन्दवन्दितं दिगम्बरं
काशिकापुराधिनाथकालभैरवं भजे ।।१ ।।
भानुकोटिभास्वरं भवाब्धितारकं परं
नीलकण्ठमीप्सितार्थदायकं त्रिलोचनम् ।
कालकालमम्बुजाक्षमक्षशूलमक्षरं
काशिकापुराधिनाथकालभैरवं भजे ।।२ ।।
शूलटङ्कपाशदण्डपाणिमादिकारणं
श्यामकायमादिदेवमक्षरं निरामयम् ।
भीमविक्रमं प्रभुं विचित्रताण्डवप्रियं
काशिकापुराधिनाथकालभैरवं भजे ।।३ ।।

भुक्तिमुक्तिदायकं प्रशस्तचारुविग्रहं
भक्तवत्सलं स्थितं समस्तलोकविग्रहम् ।
विनिक्वणन्मनोज्ञहेमकिङ्किणीलसत्कटिं
काशिकापुराधिनाथकालभैरवं भजे ।।४ ।।
धर्मसेतुपालकं त्वधर्ममार्गनाशकं
कर्मपाशमोचकं सुशर्मदायकं विभुम् ।
स्वर्णवर्णशेषपाशशोभिताङ्गमण्डलं
काशिकापुराधिनाथकालभैरवं भजे ।।५ ।।
रत्नपादुकाप्रभाभिरामपादयुग्मकं
नित्यमद्वितीयमिष्टदैवतं निरञ्जनम्
मृत्युदर्पनाशनं करालदंष्ट्रमोक्षणं
काशिकापुराधिनाथकालभैरवं भजे ।।६ ।।

अट्टहासभिन्नपद्मजाण्डकोशसन्ततिं
दृष्टिपातनष्टपापजालमुग्रशासनम् ।
अष्टसिद्धिदायकं कपालमालिकाधरं
काशिकापुराधिनाथकालभैरवं भजे ।।७ ।।
भूतसङ्घनायकं विशालकीर्तिदायकं
काशिवासलोकपुण्यपापशोधकं विभुम् ।
नीतिमार्गकोविदं पुरातनं जगत्पतिं
काशिकापुराधिनाथकालभैरवं भजे ।।८ ।।

कालभैरवाष्टकं पठन्ति ये मनोहरं
ज्ञानमुक्तिसाधनं विचित्रपुण्यवर्धनम् ।
शोकमोहलोभदैन्यकोपतापनाशनं
तेप्रयान्ति कालभैरवाङ्घ्रिसंन्निधिं नराध्रुवम् ।।९ ।।

कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने प्रणतः क्लेशनाशाय गोविंदाय नमो नमः ।। - ७ वेळा

**कृष्ण कृष्ण महाकृष्ण सर्वज्ञ त्वं प्रसिद मे । रमारमण विश्वेश विद्यामाशु प्रयच्छ मे । - ११ वेळा**

बाधानिवारण मंत्र :- ३ वेळा

एक ठोसरसों सोला राई, मोरो पटवलको रोजाई, खाय खाय पडे भार, जे करे ते मरे,
उलट विद्या ताहिपर परे, शब्द साचा पिंड काचा, तो हनुमानका मंत्र साचा, फूरो मंत्र ईश्वरी वाचा ।

## ।। ऱ्हिं नमः ।।

या माया मधुकैटभप्रमथिनी या माहिषोन्मूलिनी, या धूम्रेक्षणचण्डमुण्डमथिनी या रक्तबीजाशिनी। शक्तिः शुम्भनिशुम्भदैत्यदलिनी या सिद्धिलक्ष्मीः परा, सा चण्डी नवकोटिमूर्तिसहिता मां पातु विश्वेश्वरी ।।१।। स्तुता सुरैः पूर्वमभीष्टसंश्रया त्तथा सुरेन्द्रेण दिनेषु सेविता। करोतु सा नः शुभहेतुरीश्वरी शुभानि भद्राष्यभिहंतु चापदः ।।२।। या सांप्रतं चोद्धतदैत्यतापितैरस्माभिरीशा च सुरैर्नमस्यते। करोतु सा नः शुभ हेतुरीश्वरी शुभानि भद्राण्यभिहंतु चापदः ।।३।। या च स्मृता तत्क्षणमेव हन्ति नः सर्वापदोभक्तिविनम्रमूर्तिभिः। करोतु सा नः शुभहेतुरीश्वरी शुभानि भद्राण्यभिहंतु चापदः ।।४।। सर्वाबाधाप्रशमनं त्रैलोक्यस्याखिलेश्वरी। एवमेव त्वया कार्यमस्मद्वैरिविनाशनम् ।।५।। सर्वमङ्गलमांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके। शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणि नमोऽस्तुते ।।६।। सृष्टिस्थितिविनाशानां शक्तिभूते सनातनि। गुणाश्रये गुणमये नारायणि नमोऽस्तुते ।।७।। शरणागतदीनार्तपरित्राणपरायणे। सर्वस्यार्त्तिहरे देवी नारायणि नमोऽस्तुते ।।८।। सर्व स्वरूपे सर्वेशे सर्वशक्तिसमन्विते। भयेभ्यस्त्राहि नो देवि दुर्गेदेवि नमोऽस्तु ते ।।९।। तां दुर्गां दुर्ग मां देवी दुराचार विघातिनी। नमामि भवभीतोहं संसारार्णवतारिणीम् ।।१०।।

### ।।सूर्यस्तुतिः।।

तेजोराशे नमस्तेस्तु। नमस्ते सर्वतो मुख। विश्वव्यापिन्नमस्तेस्तु। नमस्ते शिवरूपिणे।
त्रयीमूर्तेनमस्तेस्तु। वेदत्रय नमोस्तुते। काश्यपेय नमस्तेस्तु। हरिदश्व नमोस्तुते।
ग्रहराज नमस्तेस्तु। नमस्ते चंद्ररोचिषे। वेदत्रय नमस्तेस्तु। सर्व देव नमोस्तुते।
प्रसीद पाहि देवेश। सुदृष्ट्या मां दिवाकर।

# आत्मषट्कम्, निर्वाणषट्कम् सार्थम्

मनोबुध्दयहंकारचित्तानि नाहं
न च श्रोत्रजिह्वे न च घ्राणनेत्रे।
न च व्योमभूमि: न तेजो न वायु:
चिदानंदरूप: शिवोऽहं शिवोऽहम्॥१॥
न च प्राणसंज्ञो न वै पंचवायु:
न वा सप्तधातुर्न वा पंचकोष:।
न वाक् पाणिपादौ न चोपस्थपायू
चिदानंदरूप: शिवोऽहं शिवोऽहम्॥२॥
न मे द्वेषरागौ न मे लोभमोहौ
मदो नैव मे नैव मात्सर्यभाव:।
न धर्मो न चार्थो न कामो न मोक्ष:
चिदानंदरूप: शिवोऽहं शिवोऽहम्॥३॥

न पुण्यं न पापं न सौख्यं न दु:खं
न मंत्रो न तीर्थं न वेदा न यज्ञा:।
अहं भोजनं नैव भोज्यं न भोक्ता
चिदानंदरूप: शिवोऽहं शिवोऽहम्॥४॥
न मे मृत्युशंका न मे जातिभेद:
पिता नैव मे नैव माता न जन्म।
न बंधुर्नमित्रं गुरुर्नैव शिष्य:
चिदानंदरूप: शिवोऽहं शिवोऽहम्॥५॥
अहं निर्विकल्पो निराकाररूपो
विभुर्व्याप्य सर्वत्र सर्वेन्द्रियाणाम्।
सदा मे समत्वं न मुक्तिर्न बन्ध:
चिदानंदरूप: शिवोऽहं शिवोऽहम्॥६॥

॥ इति श्रीमच्छङ्कराचार्यविरचितं आत्मषट्कं सम्पूर्णम्॥

# प.प. धर्मश्री: श्रीईश्वरानन्द सरस्वती तथा काशीस्वामींची आरती

आरती सद्‌गुरु स्वामींची । ईश्वरानन्द सरस्वतींची ।

जोडीली पुण्याची गाठी । घडली चरणाचि भेटी ।
जळली राशि पापाचि । आम्हा भीति ना कलीची ।
आरति सद्‌गुरु स्वामींची । ईश्वरानन्द सरस्वतींची ।।१ ।।

दर्शन घडता हो यांचे । भेटे ठाणे मोक्षाचे ।
चुकती फेरे जन्मांचे । सार्थक मानव देहाचे ।
आरती सद्‌गुरू स्वामींची । ईश्वरानन्द सरस्वतींची ।।२ ।।

दृष्टि अमृत वृष्टीची । भेटी अवघ्या सौख्याचि ।
लाभति राज्ये इंद्राची । घेता धुळी पायाचि ।।
आरती सद्‌गुरु स्वामींची । ईश्वरानन्द सरस्वतींची ।।३ ।।

स्मरणे यांचे हो आम्हा । होई नित्याची काशी ।
पुण्ये अवघ्या तीर्थांची । यांचे स्नाना पाठीशी ।
आरती सद्‌गुरू स्वामींची । ईश्वरानन्द सरस्वतींची ।।४ ।।

पाहुनि संन्यासि वेशा । आम्हा तृप्ति विश्वेशा ।
विनवणि स्वामि पायाशि । ठेवी दिना चरणाशि
आरति सद्‌गुरु स्वामींची । ईश्वरानन्द सरस्वतींची ।।५ ।।

रचना : श्री. बाळुकाका कुलकर्णी

## ।। कर्पूर आरती ।।

कापुराची आरती करितो तुजला गुरुराया, तुजला गुरुराया ।
तन मन धन हे चरणी अर्पुनि ओवाळिन काया... ।।ध्रु. ।।

तूचि ब्रह्मा तूचि विष्णू तूचि शंकर । तूचि शंकर ।
भक्तांसाठी युगी युगी तू धरिसी अवतार ।
चिन्मय साक्षी व्यापुनी असंसी सर्व चराचर, सर्व चराचर ।
तव गुणांचे वर्णन करिता शिणला फणीवर... ।।१ ।।

नाम रूपातीत असुनि सगुण रूप भक्तांस्तव धरिसी ।
नाना नाटक लीला दावुनि आकारातीत होसी ।
तव स्वरूपाचा अंत न लागे चारी वेदांसी, चारी वेदांसी ।
तेथे मानव किंकर केंवि जाणसी तुजसी... ।।२ ।।

सहा शास्त्रे अठरा पुराणे तुजला स्तवितातो, तुजला स्तविताती ।
वेद भागला निवांत ठेला, श्रुती म्हणती नेति नेति ।
मोठे मोठे योगि निरंतर तुज हृदयी ध्याती, तुज हृदयी ध्याती ।
शुक सनकादि नारद तुंबर कीर्तनें गाती... ।।३ ।।

सद्‌गुरू महिमा अगाध म्हणुनि, वेदश्रुती बोले, वेदश्रुती बोले ।
रामकृष्णादिक देव सर्वही चरणी लीन झाले ।
सहस्र जन्मीचे भाग्य माझे, आजि फळ आले, आजि फळ आले ।
अद्वैतभावे रामतनय हा नंदी पाउले... ।।४ ।।

कापुराची आरती करितो तुजला गुरूराया, तुजला गुरूराया ।
तन मन धन हे चरणी अर्पुनि ओवाळिन काया... ।।ध्रु. ।।

# ।। श्री गुरुस्तोत्रम् ।।

अखंडमण्डलाकारं व्याप्तं येन चराचरम् ।
तत्पदं दर्शितं येन तस्मै श्रीगुरवे नम: ।।१ ।।
अज्ञानतिमिरान्धस्य ज्ञानाञ्जनशलाकया ।
चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्रीगुरवे नम: ।।२ ।।
गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु:गुरुर्देवो महेश्वर: ।
गुरुरेव परं ब्रह्म तस्मै श्रीगुरवे नम: ।।३ ।।
स्थावरं जङ्गमं व्याप्तं यत्किञ्चित् सचराचरम् ।
तत्पदं दर्शितं येन तस्मै श्रीगुरवे नम: ।।४ ।।
चिन्मयं व्यापि यत्सर्वं त्रैलोक्यं सचराचरम् ।
तत्पदं दर्शितं येन तस्मै श्रीगुरवे नम: ।।५ ।।
सर्वश्रुतिशिरोरत्नविराजितपदाम्बुज: ।
वेदान्ताम्बुजसूर्योयस्तस्मै श्रीगुरवे नम: ।।६ ।।
चैतन्य: शाश्वत: शान्तो व्योमातीतो निरञ्जन: ।
बिन्दुनादकलातीतस्तस्मै श्रीगुरवे नम: ।।७ ।।
ज्ञानशक्तिसमारूढ: तत्त्वमालाविभूषित: ।
भुक्तिमुक्तिप्रदाता च तस्मै श्रीगुरवे नम: ।।८ ।।
अनेकजन्मसम्प्राप्तकर्मबन्धविदाहिने ।
आत्मज्ञानप्रदानेन तस्मै श्रीगुरवे नम: ।।९ ।।
शोषणं भवसिन्धोश्च ज्ञापनं सारसम्पद: ।
गुरो: पादोदकं सम्यक् तस्मै श्रीगुरवे नम: ।।१० ।।
न गुरोरधिकं तत्त्वं न गुरोरधिकं तप: ।
तत्त्वज्ञानात् परं नास्ति तस्मै श्रीगुरवे नम: ।।११ ।।
मन्नाथ: श्रीजगन्नाथ: मद्गुरु: श्रीजगद्गुरु: ।
मदात्मा सर्वभूतात्मा तस्मै श्रीगुरवे नम: ।।१२ ।।

गुरुरादिरनादिश्च गुरु: परमदैवतम् ।
गुरो: परतरं नास्ति तस्मै श्रीगुरवे नम: ।।१३ ।।

त्वमेव माता च पिता त्वमेव त्वमेव बन्धुश्च सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव त्वमेव सर्वं मम देवदेव ।।१४ ।।

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं द्वन्द्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् ।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षीभूतं भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ।।

## ।। ह्रीं ।।

यदुद्भवा: सत्वरजोस्तमोगुणा: सर्गस्थितिध्वंस निदान कारणा; ।
यदिच्छया विश्वमिदं भवाभवौ तनोति मुलप्रकृतिं नता: स्म ताम् ।।१ ।।
याहि त्रयोविंशतिभेदसंज्ञिता जगत्यशेषे समाधिष्ठिता परा ।
यद्रूपकर्माणि जडास्त्रयोऽपि ते देवा न विद्यु: प्रकृतिं नता: स्म ताम् ।।२ ।।

यद्भक्तियुक्ता: पुरुषास्तु नित्यं दारिद्र्यभी मोह पराभवादीन् ।
न प्राप्नुवन्त्येव हि भक्तवस्तलां सदैव मूलप्रकृतिं नता: स्म ताम् ।।३ ।।
स्तोत्रमेतत् त्रिसंध्यं य: पठेदेकाग्रमानस: ।
दारिद्र्यमोहं दु:खानि न कदाचित्स्पृश्यन्ति तम् ।।४ ।।

श्री गणेशाय नम: । श्री सरस्वत्यै नम: । श्री गुरूभ्यो नम: ।

कर्णस्वर्ण विलोल कुण्डलधरान्मापीनवक्षोरुहां । मुक्ताहारविभूषणां परिलसत् धन्मिल्लसन्मल्लिकाम् ।।
लीला लोलित लोचनां शशिमुखीं आबद्धकाञ्चिस्रजम् । दिव्यंतीं भुवनेश्वरींमनुदिनं वंदामहे मातरम् ।।

# परमहंस परिव्राजकाचार्य धर्मश्री: श्री ईश्वरानन्द सरस्वती तथा काशीस्वामी महात्म्य

ॐ नमो श्रीगणराया। मस्तक ठेवोनी तूज पाया। चित्ती तव रूप साठवोनिया। प्रार्थितो तुजला ये समयी ।।१ ।। नमन तुज सरस्वती माता। विद्येची तू देवता। तुझी कृपा होता। नाही काही अशक्य ।।२ ।। हे राजराजेश्वरी माते। हे भुवनेश्वरी देवते। कृपा करी तव बालकस्तवना। बाला माते ।।३ ।। वंदन माझे वेदव्यासांस। नमन त्या महर्षिस। नमन त्यांसी खास। या समयी ।।४ ।। हे देव-ऋषी गण हो। प्रार्थितो त्वां उत्कट भावो। कृपा करावी भक्तालागी। स्तवनासाठी ।।५ ।। स्तवन लाडक्या भक्ताचे। स्तवन लाडक्या शिष्याचे। आपुल्या कृपे झाले जे। ब्रह्मस्वरूप ।।६ ।। स्तवनांसाठी सद्गुरुस्मरण। वंदूनी त्यांचे चरण। गुरुपरंपरेचे स्मरण। स्तवनांलागी ।।७ ।। श्रीआद्यशंकराचार्यांचे पुण्यस्मरण। श्रीसच्चिदानन्दसरस्वतींचे स्मरण। श्रीचंद्रशेखर भारतींचे स्मरण। स्मरण सद्गुरूंचे । स्तवनासाठी ।।८ ।। एके प्रस्थापिला धर्म। एके दिला संन्यासधर्म। एके दिले आत्मज्ञान। वंदन त्यांना पुन:पुन: ।।९ ।। स्तवन माझ्या सद्गुरूंचे। स्तवन ब्रह्मस्वरूपाचे। स्तवन तेजस्वरूपाचे। सदा जे ब्रह्मलीन ।।१० ।। आवाहन केले स्तवनांसाठी। उभ्या राहो देवतांपाठी। माझी बुद्धी नाठी। स्तवनासाठी ।।११ ।। परशुरामे जी निर्मिली भूमी। नमन त्या कोकणभूमी। ज्या भूमीने दिधला। सुपुत्र ऐसा ।।१२ ।। नमन चिपळूण तालुक्यांसी। नमन कौंडर ग्रामांसी। नमन भागवत घराण्यांसी। नमन सर्वां पुन:पुन: ।।१३ ।। गंगामाता पतिव्रता। केशव नामे पिता। जन्मले ऐशा निकेता शिवस्वरूप ।।१४ ।। कौंडर ग्रामदैवत श्रीगजानन। त्याची सेवा केलीया

जाण। प्रसाद म्हणून पोटी आले। ब्रह्मस्वरूप ।।१५ ।। सन एकोणिसशे सालांस। मे महिन्याच्या तीस तारखेस। सुमुहूर्तावर जन्मला। गंगाधर बाळ ।।१६ ।। बाळ हूड, खोडकर। परंतु अत्यंत बुद्धिमान। विद्याभ्यासी निष्णात। असे सदैव पहिला ।।१७ ।। पुढे पुढील शिक्षणासाठी। आला तो चिपळूणांसी। अन्नपूर्णाकाकूंच्या सावलीत। वाढू लागला ।।१८ ।। सोडले चिपळूणांसी। गेले मुंबापुरीसी। खडतर कष्ट सोसोनिया। झाले पदवीधर ।।१९ ।। गेले एका सभेस। आवाहन केले कोणी खास। आहे का कोणी तयार। संन्यास घ्यावया ।।२० ।। उठले तीन जण तरूण। पैकी एक गंगाधर। आहो आम्ही तयार। धर्मप्रचारासाठी ।।२१ ।। संन्यासधर्माचे शिवधनुष्य। पेलणे अंती अवघड। जाणून हे अंती। गळाले इतर दोघे ।।२२ ।। गंगाधर नाम शंकराचे। रूप दुसरे वैराग्याचे। त्याजला संन्यास। काय तो कठिण ।।२३ ।। सच्चिदानन्द सरस्वतींचा सहवास। मुंबापुरीमध्ये रहिवास। गुरुसेवा केली मनोभावे। काही दिवस ।।२४ ।। नाव ईश्वरानन्द सरस्वती। ईश्वराला प्रसन्न करती। आनंदवली सरस्वती। अनुष्ठाने नि स्वाध्याये ।।२५ ।। गुरुआज्ञेने सोडिली मुंबापुरी। पायी निघाली स्वारी। आचरण संन्यासधर्माचे। धर्मासाठी ।।२६ ।। एके जागी राहो नये। भिक्षेवीण काही घेवो नये। अग्निस्पर्श करो नये। कदापिही ।।२७ ।। एकदा असा प्रसंग पातला। तीन दिवस उपवास घडला। भिक्षा नाही मिळाली। कांहिही ।।२८ ।। घडोनिया उपवास। नाही खंत नाही खेद। तडजोड व्रतामांजी। नाही केली ।।२९ ।। धर्माबद्दल बोलावे। धर्माबद्दल सांगावे। जनलोकांस सांगावे। महत्त्व धर्माचरणाचे ।।३० ।। धर्माबद्दल माहिती सांगावी। धर्माची महती गावी। गाता गाता स्वोदाहरणे। आचरून दावावी ।।३१ ।। काशी क्षेत्र पवित्र। गंगाकाठ पवित्र। अविरत वाहावे जिथे।

ज्ञानगंगा ।।३२।। तेथे केले वास्तव्य। शास्त्रचर्चा प्रवचन। स्तिमित झाले विद्वज्जन। समस्त ते काशीचे ।।३३।। विद्वान म्हणतीं ही विभूती। ज्ञानी अन् साक्षात्कारी। केला पाहिजे सन्मान। यथोचित ।।३४।। धर्मसभा बोलावली। स्तुतिसुमने ओवाळली। धर्मश्री: पदवी दिली। अतिविनम्र भावे ।।३५।। देशाटनासी फिरताफिरता। रस्त्यामध्ये श्रृङ्गेरी लागता। आनंदा येई भरता। लक्षण काही कळेना ।।३६।। आनंदाचा कल्लोळ। हृदयी विलक्षण तळमळ। गुरुओढीचा परिमळ। माउली वाट पाहे ।।३७।। दर्शन घडता माउलीचे। सद्गुरु भेटता सत्शिष्याते। प्रकटीकरण अद्वैताचे। श्रृङ्गेरीत झाले पुन्हा ।।३८।। श्रीचंद्रशेखरभारती माउली। तिच्या कृपाछत्राची सावली। गुरुशिष्याची जोडगोळी। श्रृङ्गेरीत प्रसिध्द ।।३९।। शुध्द ते आचरण। संन्यासधर्माचे रक्षण। घोर ते अनुष्ठान। सोबत गुरुसेवा ।।४०।। गुरुसेवा फळा आली। माउलीने कृपा केली। आत्मखूण ते पटली। साक्षात्कारे ।।४१।। प्रस्थानत्रयीवरचे प्रवचन। आचार्यांचे श्रीमुखातून। श्रवणाचे भाग्य मिळाले। सानुग्रह ।।४२।। लौकिक, परा अपरा। ऐशा ज्या त्रिविद्या। सद्गुरुंनी करवून घेतल्या। त्या आत्मसात ।।४३।। सौन्दर्यलहरी आचार्यकृत। दिव्य असती महामंत्र ज्यांत। त्यांची केली साधना कृपानुग्रहपूर्वक ।।४४।। गुरुप्रेम, गुरुभक्ती। पाठी असता गुरुशक्ती। आनंदाचा सोहळा गुरुसेवेत ।।४५।। अवघड प्रसंग पातला। गुरुदेह क्षीण झाला। काय करावे सुचेनां। काही केल्या ।।४६।। परब्रह्माने मार्ग दाविला। मनी एक संकल्प केला। अनुष्ठान करण्याचा। गुरु आरोग्यासाठी ।।४७।। गुरु आज्ञेने सोडता श्रृङ्गेरी। मन धावे ते माघारी। धाव घेवून कवटाळावे। वाटे गुरुचरण ।।४८।। धरली उत्तरेची वाट। लागले रस्त्यामध्ये करहाट। रम्य तो

कृष्णेचा घाट। प्रतीकाशी ।।४९ ।। कांशीसारखी नदीतीरे। कांशीसारखी मंदिरे। कृष्णेमध्ये गंगा अवतरे। स्वामी वाटें ।।५० ।। जागा पाहिजे राहाण्यास। जागा पाहिजे अनुष्ठानांस। भैरवमंदिरी केला वास। नदीकाठी ।।५१ ।। गरूडतीर्थी, भैरवतीर्थी स्नान। संध्यावंदन पूजन। त्रिशतीने अभिषेक। श्रीचक्रे ।।५२ ।। मग होता माध्यान्ह। पुन्हा करावे गंगास्नान। करुनिया संध्यावंदन। निघावे भिक्षेसाठी ।।५३ ।। ते रूप मी काय वर्णावे। त्या रूपांसी काय म्हणावे। ज्याचे त्याने जाणावे। तेजस्वरूप ।।५४ ।। गूढगंभीर मुद्रा करारी। भिक्षेसाठी निघता स्वारी। बालके पळती दूरी। उगाच भये ।।५५ ।। चालणे असे वेगांत। चालणे असे ढांगांत। चालला पहा हनुमंत। माउली म्हणतसे ।।५६ ।। ज्या घरी शुध्द आचरण। तेथील भिक्षा घेईल जाण। भिक्षेचे ते प्रमाण। मोजके असे ।।५७ ।। भिक्षेमधील कांही भाग। देत असती पांखरांस। माउलीवाचून ऐंसी चिंता। कोण करी ।।५८ ।। भिक्षेनंतर विश्रांती। विश्रांतीनंतर एकांती। एकांती अनुष्ठान। चालीतसे ।।५९ ।। धर्मग्रंथांचे वाचन। आणि करावे परिशीलन। सतत मनी चिंतन। परब्रह्माचे ।।६० ।। वेदान्त तत्व चिंतन। यतीधर्माचे अनुष्ठान। निमग्न ऐसे ध्यान। आदर्श जाणावे ।।६१ ।। सायंकाळी स्तवन। नित्याचे पारायण। सोबत असे शिष्यगण। भैरवासमोरी ।।६२ ।। आदिशिष्ये ती कमला। नंतर आली सुशिला। उभयतें केली सेवा। मनोभावे ।।६३ ।। श्रीरामभक्त विजया। सद्गुरु ते पुजूनीया। करीतसे सेवा। रांगोळी काढून ।।६४ ।। नंतर आला शिष्योत्तम। नांव त्याचे शांताराम। प्रेमे म्हणती स्वामी। अरे बाळू ।।६५ ।। शिष्यासमवेत तीर्थाटन। तीर्थक्षेत्री तीर्थस्नान। सर्व शिष्या घालत असती। स्नान स्वहस्ते ।।६६ ।। व्यासपूजेचा उत्सव। त्यांचा तो उत्साह। गुरूपूजे गुरू स्मरता। अश्रू ढाळी ।।६७ ।।

श्रीगणेशपूजनाने सुरवात। रूद्र आणि पुरुषसूक्त। यांनी असे अभिषेक। श्रीपादुकांना ।।६८ ।। कैवल्योपनिषद आणि दैव्योपनिषद। सोबत देवी अथर्वशीर्ष। यांनी ही अभिषेक। पादुकांना ।।६९ ।। नंतर त्रिशतीने अभिषेक। सोबत विष्णुहसहस्रनाम। व्यास-आरती, गुरुस्तवन। सांगता मंत्रपुष्पे ।।७० ।। पादस्पर्शा उत्सुक। शिष्य तो प्रत्येक। मिळे ही संधी। वर्षातून एकदा ।।७१ ।। शिष्यांसाठी खास अनुष्ठान। शिष्यांचे एवढे भान। सद्‌गुरुवाचोन दूजे कोणी। करेचीना ।।७२ ।। आलेली गुरुदक्षिणा। पाठवे श्रृङ्‌गेरी जाणा। स्वत:साठी कांही। ठेवेचिना ।।७३ ।। प्रथमदर्शनी रागीट। परंतु अंतरी मधाळ। बाहेरून कठीण। जैसेकी श्रीफळ ।।७४ ।। कोणी काही मागितले। मला देता येत नाही म्हणावे। पुन्हा माघारी बोलवावे। संकट परिमार्जनासाठी ।।७५ ।। गुरुमाउली मायाळू। फार असे कनवाळू। गरीबांचे दु:ख पाहावेचिना ।।७६ ।। सांगे घरी जाय। करी हा उपाय। यश मिळेल खचित। या मंत्रजपे ।।७७ ।। कित्येकांसी ऐंसी। अनुभुती आली जैसी। त्याची जंत्री करणे। महाकठिण ।।७८ ।। उदाहरणादाखल कांही। प्रसंग सांगतो बाही। सागरातून ओंजळभर। जैसे पाणी ।।७९ ।। कमलताईंच्या मातोश्रींस जाणी। कथिले होते कोणी। येईल संन्यासी झणी। देण्या मुक्ती ।।८० ।। स्वामी गेले अवचित। उभे राहिले दारांत। यायचे आहे आंत। विभुती लावण्या ।।८१ ।। अंगास लावता विभुती। तेजस्वी झाली सती। मिळाली तिला मुक्ती। स्वामीस्पर्शे ।।८२ ।। स्वामीसेवेत अडचण खरी। होऊ लागली नोकरी। आले सोडून माघारी। बाळूकाका ।।८३ ।। तात्काळ त्यांना कराडात। नोकरी मिळाली उत्तम। स्वामीसेवा सहज। झाली शक्य ।।८४ ।। श्रृङ्गेरी गोशाळेतील गायींची। भूतबाधा काढण्यासाची। जगद्‌गुरुंनी पाचारण। असे केले

स्वामींना ।।८५ ।। आधी गोमातेचा कळवळा । त्यांत गुरूघरचा लळा । उपाय तात्काळ । केला स्वामींनी ।।८६ ।। धडधडा उठल्या गोमाता । ज्या होत्या गात्रगलिता । चाटू लागल्या प्रेमाने । स्वामींचे चरण ।।८७ ।। बडोद्याच्या व्यासांस झाला पहा सुपुत्र । नाम त्याचे योगेश । स्वामीकृपे ।।८८ ।। अजित अंजली दंपती । त्यांना नव्हती संतती । प्रकटली चैतन्यमूर्ती । स्वामीकृपे ।।८९ ।। कराडातील उमराण्यांस । नोकरी मिळाली शासकीय । अशक्य झाले शक्य । स्वामी उपाये ।।९० ।। मोहोळकराचे बुडालेले पैसे । मिळाले त्याला परत कैसे । स्वामींवाचून दूजे कोणी । करावे कैसे ।।९१ ।। भूतबाधा, भानामती । मधुकर पानस्याघरची । दूर केली स्वामींनी । आत्मबळे ।।९२ ।। शालिनी जोशींच्या कर्कबाधेस । वसंत जोशींच्या पक्षाघातास । पिटाळले दूर । स्वामींनी स्वबळे ।।९३ ।। जीवंतपणी मुक्त । ऐसा हा संत । कराडकर भाग्यवंत । खरोखरी ।।९४ ।। ऐशा या स्वामींनी । संकल्प केला मनी । सद्‌गुरुंसारखीच । घ्यायची समाधी ।।९५ ।। संन्यास दीक्षा दिन । अन् समाधी दिन । असावा एकच । शिष्यसोये ।।९६ ।। बाळूकाकांना स्वप्नांत । झाला एक दृष्टान्त । नाही कळाला संकेत । तरीसुध्दा ।।९७ ।। वाहत आली नदीतून । पादुका अन् छाटी । हाती आल्या पादुका । गेली वाहून छाटी ।।९८ ।। मार्गशीर्ष शुध्द सप्तमी । संन्यासदीक्षा दिनी । आमंत्रिले सर्व शिष्या । पूजेसाठी ।।९९ ।। प्रत्येकाशी बोलणे । प्रत्येकाची चौकशी । श्रीफळ प्रसाद । आवर्जून प्रत्येका ।।१०० ।। बाहेरगांवच्या शिष्यांना । संकेतसमाधीचा स्वामींनी । विविध प्रकारे । दिला असे ।।१०१ ।। नगरच्या जोशींचा नातू । सुमित नामे बालकू । सांगू लागला सर्वांना । कराडला जायचे ।।१०२ ।। नगरच्या घरी सायंकाळी । ठीक आरतीच्या वेळी । साक्षात आले स्वामी । वायुरूपे ।।१०३ ।। ऐंशी सूचना

अनेकांना। मिळाली असे जाणा। समाधीची स्वामींच्या। खरोखरी ।।१०४ ।। गीतेमध्ये कथिल्याप्रमाणे। प्रयाणकाले मनसाऽचलेन। ऐशा या श्लोकांतील। उक्तीप्रमाणे ।।१०५ ।। स्वामींनी घातले आसन। सद्‌गुरूंचे केले स्मरण। आणून दोन भ्रुकुटीमध्ये प्राण। केला देहत्याग ।।१०६ ।। देहरूपातून स्वामी जरी। जाहले अनंतरूप तरी। भेटतील ते कोठेही। भावबळे ।।१०७ ।। त्यांचे हे स्तवन। करतो त्यांनाच अर्पण। दोष, चूक कांही। क्षमा करा ।।१०८ ।। इति ।।


– स्वामीप्रेरित शब्दांकन

**श्रीकांत वसंतराव जोशी**

९९२२३९२३९२

९४२२२२२३९२